# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने कुर्डुवाडी येथे बहु-विशेष आरोग्य तपासणी शिबिरासह स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान चा उद्घाटन सोहळा संपन्न

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १७ सप्टेंबर २०२५ रोजी कुर्डुवाडी उपविभागीय रेल्वे रुग्णालय येथे बहु-विशेष आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करून स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान मोहिमेचे उद्घाटन केले. या उपक्रमाचे उद्दिष्ट महिलांच्या आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करणे आहे, जे कुटुंबांचे कल्याण सुनिश्चित करण्यात आणि संपूर्ण समाजाला सक्षम करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.







यावेळी प्रभारी वैद्यकीय अधिकारी यांनी स्वागत भाषण केले, शिबिराचे उद्दिष्ट अधोरेखित केले आणि महिलांचे आरोग्य हे एका मजबूत समाजाचा कणा आहे यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे प्रमुख मुद्दे

- माता आणि बाल आरोग्य, पोषण, मासिक पाळीची स्वच्छता, अशक्तपणा प्रतिबंध आणि जीवनशैली व्यवस्थापन यावर जागरूकता व्याख्याने.
- विशेष महिला आरोग्य तपासणी शिबिरात हिमोग्लोबिन चाचणी, रक्तदाब देखरेख आणि समुपदेशन सेवांचा समावेश आहे.
- आरोग्य शिबिरात सहभागी मधील विविध आरोग्य समस्यांची यशस्वीरित्या ओळख पटवून आणि त्यांचे निराकरण करण्यात आले.
- एकूण लाभार्थी: २३२ (७५ महिला लाभार्थ्यांसह). उद्घाटन कार्यक्रमाला सोलापूर येथील डॉ. कोटनीस मेमोरियल डिव्हिजनल रेल्वे हॉस्पिटल (डीआरएच) चे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. मंजुनाथ जी. एस. आणि त्यांच्या समर्पित वैद्यकीय पथकासह आणि जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी येथील सन्माननीय वैद्यकीय अधीक्षक श्री. आर. व्ही. जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. वरिष्ठ रेल्वे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि कर्मचारी कुटुंबातील सदस्यांनी या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली.

स्वस्थ नारी, सशक्त परिवार या अभियानांतर्गत या व्यापक आरोग्य उपक्रमाने केवळ जागरूकता निर्माण केली नाही तर त्वरित वैद्यकीय मदत आणि समुपदेशन देखील केले, ज्यामुळे भारतीय रेल्वेची कर्मचारी, त्यांचे कुटुंब आणि मोठ्या प्रमाणात समुदायाच्या कल्याणासाठी असलेली वचनबद्धता बळकट झाली. सोलापूर विभाग अशा कल्याणकारी कार्यक्रमांद्वारे आरोग्य, जागरूकता आणि प्रतिबंधात्मक काळजी यांना प्राधान्य देत आहे, ज्यामुळे निरोगी आणि सक्षम कर्मचारी वर्ग सुनिश्चित होतो.

# लातूरच्या सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याच्या मुलीचा पुण्यात खून!

## पती, सासू व नणंदेला अटक करा अन्यथा आत्मदहन करणार : विष्णू शिंदे यांचा पत्रकार परिषदेत इशारा

**लातूर/प्रतिनिधी :** औसा तालुक्यातील नागरसोगा येथील मूळचा रहिवाशी असलेल्या आणि सद्या पुणे येथे राहत असलेला जावई आकाश, सासू गीताबाई व नणंद जयश्री, अजिंक्य, नितीन, आशिष यांनी संगमताने आपल्या विवाहित मुलीला पैशासाठी छळ करून तीचा खून करून आत्महत्येचा बनाव रचला आहे. संबंधितास तात्काळ अटक करून दोन दिवसात कठोर शिक्षा द्यावी, अन्यथा पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालसमोर कुटुंबासह आमरण आत्मदहन करण्याचा इशारा आज काशी लिंगेश्वर नगर, लातूर येथे १९ सप्टेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत हुंदका भरल्या अवस्थेत सेवानिवृत्त पोलीस अधिकारी विष्णू शिंदे यांनी दिला आहे.





विष्णू शिंदे यांनी म्हटले आहे कीं, १० जून २०१४ रोजी माझी मुलगी अनुराधा हिचा विवाह रितिरिवाजाप्रमाणे औसा तालुक्यातील नागरसोगा येथील आकाश यांच्याशी लावून दिला होता. सर्व देणी करून हा विवाह पार पडला. सुरुवातीचे दोन वर्षे सुरुळीत आनंदित चालले होते. त्यांना एक मुलगा व एक मुलगी आहे. सद्या ते पसायदान सोसायटी, यमुनानगर निगडी येथे प्लॅट नं. १५ मध्ये राहत होते.

ज्या ज्या वेळेस सासरच्यांनी पैसे मागितले त्या त्या वेळेस पैसे दिले. आतापर्यंत ५० लाख रुपये दिले आहेत. जावई जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करीत होते. अशातच आणि अचानक १ सप्टेंबरला दुपारी सव्वा चार वाजताच्या दरम्यान विष्णू शिंदे यांना जावई आकाश यांचा फोन आला कीं तुमच्या मुलीने आत्महत्या केले आहे. लागलीच शिंदे यांचे सर्व कुटुंबीय पुण्याला गेले. तिथे मुलीचा मृतदेह पाहून सर्वांनी एकच हंबरडा फोडला. मुलीच्या शरीरावर मारहानीचे व्रण दिसून आले. तिला आधी जिवे मारून नंतर साडीने गळफास देऊन सिलिंग फॅनला लटकावण्यात आलेले स्पष्ट दिसून येत आहे. तिने आत्महत्या केली नसून तीचा शारीरिक व मानसिक छळ करून तीचा खून करण्यात आला आहे. असा आरोप मुलीचे वडील विष्णू शिंदे यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. माझ्या मुलीचा छळ करून तीचा खून करणाऱ्या तिच्या पतीसह, सासू व नणंद इतर सहभागी आरोपीना गुन्हा दाखल होऊन १८ दिवस झाले तरी फरार आरोपीना अटक करण्यात आलेली नाही. आरोपीना तात्काळ अटक करून त्यांना कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी मयत मुलीचे वडील सेवानिवृत्त पोलीस अधिकारी विष्णू शिंदे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. अन्यथा दोन दिवसानंतर पुणे पोलीस अधीक्षक करायलासमोर कुटुंबासह आमरण उपोषण करून आत्मदहन करणार असल्याचा इशारा दिला आहे.


### नाव बदलणे

मी माझे नाव अंजू एच के त्रिपाठी वरून अंजू हरिकेश त्रिपाठी असे बदलले आहे. या घोषणेमुळे आणि या नावाने ओळखला जाईन. मी भविष्यात अंजू हरिकेश त्रिपाठी वापरेन आणि तेच नाव मी वापरेन.
जुने नाव : अंजू एच के त्रिपाठी
नवीन नाव : अंजू हरिकेश त्रिपाठी
फ्लॅट क्रमांक ४०३ लक्ष्मी डायमंड अपार्टमेंट, सरस्वती कॉलनी, लातूर (एमएस) ४१३५१२



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


### अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले

**बीड/प्रतिनिधी :** महाराष्ट्रच्या मराठवाडा व कोकण भागात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस जिल्ह्यांना झोडपून काढत आहे. सोलापूर, बीड, हिंगोली आणि लातूरमध्ये शेतकरी, नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झालंय. नदीकाठच्या गावांत शेतजमिनी पाण्याखाली गेल्या, पिकांचे मोठे नुकसान झाले, रस्ते वाहून गेले, पूल उध्वस्त झाले आणि विद्युत पोल आडवे झाले.

# प्रकाश शेटे इंग्लिश स्कूल नळेगाव येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन उत्साहात साजरा

नळेगाव (अजगर मजकुरी)-प्रकाश शेटे इंग्लिश स्कूल नळेगाव येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन उत्साहात साजरा नळेगाव -येथील प्रकाश शेटे इंग्लिश स्कूलमध्ये दि. १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री.उमाकांत शेटे संस्थेचे सचिव प्रभाकर डोंगरे ,मधुकर डोंगरे,माधव पोतदार,रवी टाक उपस्थित होते.तसेच वैशाली गौंड,निता कबनुरे,उझमा बागवान, प्रणाली टाक, प्रतीक्षा गायकवाड, प्रियांका शिंदे, करुणा भोसले,सम्रिन शेख,श्वेता शेंडगे, श्रावणी बिराजदार, विनिता बाके,मुजावर समीना, नीलम कांबळे,दुर्गा पांचाळ, महादेवी पांचाळ, विजय पांचाळ,राम परले, अक्षय सूर्यवंशी, कृष्णा मुद्दुडे, विशाल वाघमारे, मन्मथ कुरुपखेळे, सागर सावंत,जोतीराम गुरव,गणेश चलवदे शिक्षक व इतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहणाने ,झाली. त्यानंतर राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीताचे गायन करण्यात आले.उमाकांत शेटे यांनी मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा इतिहास आणि त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. त्यांनी सांगितले की, आजच्या तरुणांनी या इतिहासातून प्रेरणा घेऊन मराठवाड्याच्या विकासासाठी प्रयत्न करायला हवेत. यावेळी विद्यार्थ्यांनीही विविध देशभक्तीपर गीते, भाषणे आणि नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता १ ते ९वी च्या विद्यार्थ्यांनी मुक्तीसंग्रामावर अनेक असे प्रभावी भाषण दिले. त्यांचा भाषणाने उपस्थितांना मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण करून दिली. तसेच, विद्यार्थ्यांनी 'जय महाराष्ट्र माझा' या गीतावर समूह नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमाच्या शेवटी, मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, हा दिवस आपल्याला मराठवाड्याच्या स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या योगदानाची आठवण करून देतो. आपण या स्वातंत्र्यसैनिकांचे सदैव ऋणी राहिले पाहिजे. त्यांनी कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे कौतुक केले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरमने झाली.



### प्रांजळ ..

झाल्या केल्या चुका
कबुलीद्यावी प्रांजळ
मनोमन वहावीकधी
क्षमापुष्पांचीओंजळ

अनेकघडले अपराध
चोरुन अथवा उजळ
मोकळेकरता मनांस
कमीहोईल जळजळ

सुस्पष्टदिसे काळोख
डोळ्यां घाले काजळ
कधी ना लागावी दृष्ट
प्रतिमा ठेवा सोज्वळ

बोलावे मनात दडले
चरित्रकरायचे निर्मळ
चिखलात राहूनसुध्दा
जसे फुलारते कमळ

किती भुलावण दिसो
होऊ नकात उतावळ
मान्य करावे प्रमादास
मुळीचं नसे कुणावळ

चाला खडतर वाटेवर
मागे पसरावी हिरवळ
दिमाखदार ते प्रस्थान
रहावा स्मृतीत दरवळ

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात वर्गशः पालक मेळावा उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात आठवी ते दहावी विभागात वर्गशः पालक मेळावा दि. १९ सप्टेंबर २०२५ शुक्रवार रोजी उत्साहात संपन्न करण्यात आला. याप्रसंगी आठवी ते दहावी विभागातील एकूण ३२ तुकड्यातील पालकांनी आपल्या पाल्याच्या वर्गशिक्षकांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व विषयावर चर्चा करण्यात आली. काही पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी प्रत्येक वर्गातील पालक प्रतिनिधींचे वर्गशिक्षकांमार्फत स्वागत करण्यात आले.



यानंतर पालकांच्या एकत्रिकरणाच्या कार्यक्रमप्रसंगी मंचावर केशवराज माध्यमिक विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, शिक्षक-पालक संघाच्या अध्यक्षा दुर्गा गोविंदपुरकर, उपाध्यक्षा शैलेजा हासबे, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी ज्ञान, संस्कार व राष्ट्रभक्ती या मार्गावर मार्गक्रमण करत हे संस्कार केंद्र पुढे जात आहे, असे सांगितले. विद्यालयात शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच चित्रकला, संगीत, खेळ, लेखन या सर्व क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन, त्यांना सर्वगुणसंपन्न घडवण्याचा प्रयत्न केला जातो. विद्यालयात विविध स्पर्धा परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो, असे सांगून पालकानी दिलेल्या उत्तम प्रतिसादाबद्दल याप्रसंगी आभार मानले. यानंतर माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गंगाधर खेडकर म्हणाले, की शिक्षक, पालक, प्रशासकीय अधिकारी व संस्था पदाधिकारी यांच्या समन्वयातूनच सामाजिक जबाबदारी असणारा विद्यार्थी घडवणे शक्य होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा पालक मेळाव्यांचे महत्त्व असते, असे सांगून वेळात वेळ काढून आल्याबद्दल सर्व पालकांचे याप्रसंगी त्यांनी अभिनंदन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वैशाली फुलसे यांनी केले तर शैला कुलकर्णी यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, कार्यक्रम प्रमुख लक्ष्मण गिराम, सर्व वर्गाचे वर्गशिक्षक तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६